**नि.फौ.मु.क्र.१९/२०१५**

**सरकार –वि– अब्दुल रहिम व इतर**

**<u>निशाणी क्रमांक ७०</u>**

**<u>सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०१ ची साक्ष शपथेवर सुरू</u>** :–

माझे नाव :– यासमीन बानो अब्दलु रहीम.

वय :–४० वर्ष, व्यवसाय :– गृहीणी.

राहणार :–शेगाव, ता. शेगाव, जिल्हा बुलडाणा.

**<u>सरतपासणी : सरकारी वकील श्री. के. व्ही. गारमोडे यांच्यामार्फत सुरू</u>** :–

१. माझे लग्न अब्दलु रहीम शेख इस्माईल सोबत दि. १४.१२.२००३ रोजी मुस्लीम जाती रिवाजाप्रमाणे झाले होते. लग्नानंतर मी माझे पतीच्या घरी बाळापुर येथे नांदण्यासाठी गेले. माझ्या सासरी पती, सासु सासरे, दिर, नणंद, जेठ, जेठाणी व माझ्या पतीच्या आत्याचा मुलगा राहत होते. सुरवातीचे १५ महिने आरोपींनी मला सासरी छान नांदविले. त्यानंतर मला पहिली मुलगी झाली त्यामुळे माझ्या सासरची मंडळी माझा राग करीत होती. मी डेलीव्हरी नंतर माझ्या बाळाला घेऊन सासरी आली त्यावेळी माझी सासु व पती मला म्हणत होते की आम्हाला मुलगा पाहिजे होता परंतु मुलगी झाली. तेव्हा पासुन माझे पती मला मारठोक करुन शिवीगाळ करायचे. मला माझ्या पतीपासुन दोन मुली व एक मुलगा झाला. त्यावेळेस माझे पती मला म्हणायचे की दोन मुली व एक मुलगा माझे नसुन तुला दुसऱ्यापासनु झाले आहे व माझ्या चारित्र्यावर संशय घ्यायचा. मागील दोन महिन्यांपासुन माझे पती मला म्हणायचे की विट भट्टीसाठी एक लाख रुपये माहेरुन घेऊन ये व जर तु सदर पैसे आणले नाही तर तुला सासरी राहु देणार नाही. तो माझा मानसिक छळ करीत होता. सदर मागणीसाठी माझी सासु, दिर, नणंद माझ्या पतीला प्रवृत्त करायचे माझा पती मला धमकी देत होता की जर पैसे आणले नाही तर मी तुला फारकती देईल. मी माझ्या पतीला समजुन सांगीतले की माझे आई वडिल गरीब आहेत व ते तुझी मागणी पुर्ण करु शकणार नाही. माझा पती, माझी सासु व दिर व इतर सासरच्या मंडळींनी मला दोन ते तीन वेळा घासलेट टाकुन मारण्याचा प्रयत्न केले. माझ्या पतीचे मागील चार वर्षा पासुन अमरावतीची वंदना पाटील हिच्या सोबत अनैतीक संबंध आहेत. माझे पती वंदनाला भेटायला प्रत्येक

आठवड्याला जात होते व पुर्ण कमाई तिच्यावर खर्च करायचे. मी बरेचवेळा त्यांना समजवण्याचा प्रयत्न केला परंतु माझे पती मला म्हणायचे की मी वंदना सोबत लग्न करेल व तुला फारकती देईल. माझी सासु व नणंद मला टोमणे मारुन माझी बेईजत्ती करायची. माझी सासु माझ्या पतीला म्हणायची की ही दिसायला खास नाही व हिला दोन मुली झाल्या त्यामुळे हिला सोडुन दे. असे म्हणुन ते माझा शारिरीक छळ करायचे. माझ दिर मला काही न काही कारणांनी छिन्नाल रांड अशी शिवीगाळ करायचा व लाथ मारायचा. माझी जेठाणी मला दिवसभर घराचे काम करायला लावायची व कामात कुठली चुक झाली तर माझ्या पती समोर मला मारहाण करायची. माझ्या पतीच्या आत्याचा मुलगा हा माझ्या विरुध्द माझ्या पतीला भडकवायचा व मला मारठोक करण्यास प्रवृत्त करायचा. माझ्या पतीने व दिराने एक प्लॅाट विकला होता व त्याच्या पैशाबाबत मी माझ्या पतीला विचारले त्यामुळे दि. १४.१०.२०१३ रोजी माझ्या दिराने घासलेट टाकुन मारायची धमकी दिली. मी माझ्या भावाला फोन करुन बाळापुर येथे बोलाविले व त्यानंतर भावासोबत फिर्याद द्यायला गेली होती परंतु पोलीसांनी कोणतीही कार्यवाही केली नव्हती. माझा संसार उध्वस्त होऊ नये या कारणामुळे मी माझ्या पतीकडे नांदण्यास गेले परंतु माझे पती मला नांदविण्यास तयार नव्हते. दि. २४.१०.२०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता माझ्या पतीने माझ्या वडिलांकडुन रुपये एक लाख आणण्यास सांगीतले व मी त्यांना सदर पैसे आणु शकत नाही असे म्हटले असता माझ्या पतीने मला बेदम मारहाण केली व बाकी इतर सासरच्या मंडळींनी माझ्या पतीला म्हटले की ही नेहमीची कटकट इथेच संपवुन टाक व या सर्वांनी मिळुन मला व माझ्या दोन मुलींना घराबाहेर हाकलुन दिले. सर्व आरोपी माझा मानसिक, शारिरीक व आर्थीक छळ करीत असल्यामुळे मी त्यांच्या विरुध्द फिर्याद दिली. आता मला फिर्याद व छापील एफ.आर. आर. दाखविली, त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र. ७१ व ७२** देण्यात येते. पोलीसांनी मला बाळापुर येथील सरकारी दवाखान्यात नेले होते. बाळापुर पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत चौकशी करुन माझे बयाण घेतले होते. जेव्हा प्रकरण शेगावला आले त्यावेळेस शेगाव पोलीसांनी सुध्दा माझे बयाण घेतले होते. आता मला बाळापुर पोलीसांनी घेतलेला जबाब दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ७३** देण्यात येते. मी सर्व आरोपींना ओळखते. आरोपींना न्यायालयात हजर राहण्यापासुन नि.क्र. ६९ अनव्ये सुट देण्यात आली आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए.एस. वाकोडे वकिल साहेब यांचे मार्फत** –

२.  आरोपी क्र. १ सोबत माझे लग्न ज्या मध्यस्थी लोकांनी जोडले होते त्यांची नावे मला आठवत नाही. मला लग्नात रुपये ७, ७८६/– ऐवडा मेहर मिळाला होता. लग्नानंतर आरोपींनी मला कोणत्या तारखे पर्यंत चांगले वागविले ती तारीख मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की सन २००५ पर्यंत आरोपींनी मला चांगली वागणुक दिली. मी सन २००५ ते सन २०१० पर्यंत आरोपींविरुद कोणतीही पोलीस तक्रार केली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की मला संसार खराब करायचा नव्हता म्हणुन तक्रार केली नाही. माझ्या पहिल्या डिलीव्हरीचा खर्च माझ्या आई वडिलांनी केला होता. त्यानंतर मला दोन मुली झाला त्याच्या डिलीव्हरीचा खर्च माझ्या आई वडिलांनी केला व एक मुलगा झाला त्याच्या खर्च माझ्या सासरच्या लोकांनी केला. मला पहिली मुलगी सन २००४ साली झाली. मला दुसरा मुलगा सन २००६ मध्ये झाला, तीन नंबरची मुलगी सन २००८ मध्ये झाली. हे मला माहिती नाही की जेव्हा माझे लग्न आरोपी क्र. १ सोबत जुळण्याच्या आधी माझ्या आई वडिलांनी व माझ्या घरच्या मोठ्या लोकांनी आरोपी क्र. १ ची पुर्णपणे चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस माझे लग्न जुळत होते त्यावेळेस मला आरोपी क्र. १ बाबत पसंती विचारली होती व मी आरोपी क्र. १ पसंत असल्याची बतावणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की लग्नानंतर मी सासरी गेल्यानंतर आरोपी क्र. १ च्या वडिलांचा व भावाचा विटभट्टीचा मोठा कारोभार होता. हे म्हणणे खरे आहे की त्यावेळेस ते भरपुर पैसा कमावत होते. हे म्हणणे खरे आहे की विटभट्टीच्या व्यवसायामधुन आरोपी क्र. १ कडे ट्रक्स होते, प्लॅाटस् होते, मोठे मोठे घर होते व संपत्ती होती. हे म्हणणे खरे आहे की मी हा सगळा कारोभार स्वतः पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की मी जेव्हा पहिल्यांना फिर्याद दिली होती ती मी टंकलीखीत करुन आणली होती. हे म्हणणे खरे नाही की सदरची फिर्यादी माझ्या माहेरील मोठ्या लोकांच्या सांगण्यावरुन टंकलीखीत करण्यात आली व त्यानंतर मी त्यावर सही केली. बाळापुर पोलीसांनी माझी किती कागदांवर सही घेतली हे मला आजरोजी आठवत नाही. मी बाळापुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिलयानंतर बाळापुर पोलीसांशी माझा संबंध आला नाही. हे म्हणणे खरे आहे की शेगाव पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट आल्यानंतर माझा शेगाव पोलीसांशी सुध्दा संबंध आला नाही.

३.  मी बाळापुर पोलीस स्टेशन येथे दिलेली फिर्याद स्वतः वाचुन पाहिली होती.

साक्षीदाराला साक्ष देताना अचानक चक्कर येत असल्यामुळे साक्षीदाराचा उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येतो.

**स्वा./–**

**( एम. के. गोटे )**

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,

शेगाव.(कोर्ट नं.२)

दिनांक –२९.०४.२०२५.

**स्वा./–**

**( एम. के. गोटे )**

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,

शेगाव.(कोर्ट नं.२)

दिनांक – २९.०४.२०२५.